Friday, February 21, 2025
8:05 PM

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २१/०२/२०२५

पळवुन नेणे —

| अ. क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टै फ्रेजरपुरा अप क्र १६२/२०२५ कलम १३७ बी एन एस | अमरावती | घ ता वेळ<br>दि. २०/०२/२०२५ चे १४/०० वा<br>दा ता वेळ<br>दि. २१/०२/२०२५ चे ००/१९ वा | एक महिला | जय वानखडे वय १८ वर्ष रा. ओरंगपुर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि व फिची बहीन असे आम्ही धुणीभांडी चे काम करणेकामी निघालो असता नमुद घ ता वेळी व ठिकाणी येथें आरोपी हा त्याचे दुचाकी मोटार सायकल ऑरेन्ज ब्लॅक रंगाची गाडी घेवुन आला व फिची बहीनीला गाडीवर बस असे म्हणुन जबरस्तीने गाडीवर बसविले तर फि हीने आरोपीला म्हटले कि माझा बहीनीला जबरजस्ती गाडीवर बसुन कोठे घेउन जात आहे तुझे नाव माझे आई ला सांगेल तर आरोपी याने फि सोबत काही न बोलता फि चे बहीनीला गाडभ्वर बसुन जबरजस्तीनक फुस लावुन पळवुन गेला त्याचे दुचाकी वाहन क्र फि हीला माहीत नाही फिच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

घरफोडी –

| अ. क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | झोन क्र | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप क्र ९१/२५<br>कलम ३०५(अ) भा न्या स | पोउप आ परीमंडळ-१अम शहर | रुम न ४५ समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह बिटाभट्टी जवळ निभोरा अम. | दि.१८/०२/२०२५ चे ११.००वा ते दि. १८.०२.२०२५ चे २०.३० वा. दरम्यान<br>दाखल ता वेळ दि.२१/०२/२०२५ चे १३/४६ वा | प्रज्वल अरविंदराव हिवसे वय २२ वर्ष शिक्षण रा. दाभाडा पो स्टे मंगरुळ दस्तगीर ह.मु. रुम न ४५ समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह बिटाभट्टी जवळ निभोरा अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपीने फिर्यादिच्या रुम न ४५ समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह बिटाभट्टी जवळ निभोरा अम.येथे वैयक्तीक कामाकरिता त्याचा लेनोवो कपनीचा लॅपटॉप sr no. PF३८N१GY कि. अ. ४५०००/- रु. चा.रुम मध्ये बॅग ठेवलेला रुम वर परत येवुन पाहिले असता लॅपटॉप दिसला नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला आहे. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

जबरी चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पो.स्टे राजापेठ अप क्र.८०/२०२५ कलम ३०९(५),३(५) **BNS** | विवेकानंद कॉलनी बापट कॉलनी अमरावती फिर्यादीचे घरासमोर सार्वजनिक ठिकाणी | दि.२०/०२/२०२५ चे २१-३० वा. दरम्यान<br>दा.ता.वेळ २१/०१/२०२५ वेळ ०१-१३ वा. | प्रविण सुरेशचंद्र करवा वय ४२ वर्ष रा. विवेकानंद कॉलनी बापट कॉलनी अमरावती | दोन अनोळखी इसम १) वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष , २)वय अंदाजे २५ ते ३० वर्ष पांढ-या रंगाची मारूती स्विफ कार | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घ.ता.वेळीव ठिकाणी फिर्यादी हे व्यवसायाच्या हिशोबाची रोख रक्कम अंदाजे ६०,००० रू. त्यांचे मोटर सायकलचे डिक्कीमधुन काढत असतांना यातील आरोपीतांनी त्यांचे पांढ-या रंगाचे मारूती स्विफ कार हि फि. चे मोटर सायकल जवळ नेवुन फि. चे डोळ्यात मिरचीपुड टाकुन फि. चे डिक्कीमधील रोख रक्कम ६०,००० रू. व हातातील मोबाईल फोन जबरीने हिसकावुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. नांदगाव पेठ अप.न. ७१/२५ कलम २८५ BNS | | विनय व ला मंगलकार्यालय शेगाव रहाटगाव रोड परीसर | दि. २०/०२/२५ चे १९/३० वा. दा. ता. वेळ दि. २१/०२/२५ चे वा.००/१९ वा. | सरतर्फे पोउपनी मोहन रुपरावजी चोखट पो.स्टे.नांदगावपेठ अमरावती शहर | नामदेव महादेवराव राऊत वय ५६ वर्ष रा.जानकी नगर,शेगाव राहटगाव रोड अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी हे पो. स्टे. हद्दीत पो. स्टॉफ सह पेट्रोलींग करीत असतांना नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी ने मानस पान सेंन्टरची हातगाडी ही आमरोडवर लावुन लोकांच्या जिवीतास व सुरक्षितेस धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभी करुन विक्री करतांना मिळुन आला. नमुद आरोपीचे कृत्य हे कलम २८५ BNS प्रमाणे होत असुन फिर्यादीचे यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो. स्टे. नांदगाव पेठ अप.न. ७२/२५ कलम २८५ BNS | | रहाटगाव रोड परीसर | दि. २०/०२/२५ चे २०/०० वा. दा. ता. वेळ दि. २१/०२/२५ चे वा.००/२५ | सरतर्फे पोउपनी मोहन रुपरावजी चोखट पो.स्टे.नांदगावपेठ अमरावती शहर | तेजस शेषरावजी भिलावे वय २७ वर्ष रा.रहाटगाव अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी हे पो. स्टे. हद्दीत पो. स्टॉफ सह पेट्रोलींग करीत असतांना नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी ने चिन्टु पान सेन्टर ची हातगाडी ही आमरोडवर लावुन लोकांच्या जिवीतास व सुरक्षितेस धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभी करुन पान खर्रा ची विक्री करतांना मिळुन आला. नमुद आरोपीचे कृत्य हे कलम २८५ BNS प्रमाणे होत असुन फिर्यादीचे यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| १ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र ५९/२५कलम २२३ BNS, सह कलम ३३ क्ष /१३१ म.पो.का ८ | २ | चित्रा चौक येथे सरोज टॉकीज जवळ गुजरात कांती रेस्टॉरेंट व कन्हैय्या रेस्टॉरेंट अमरावती | दिनांक २०/०२/२५ रोजी २३.५५ वा ते दि. २१.०२.२५ ००.१५वा पावेतो दाखल दिनांक २१/०२/२५ चे ०२.०२ वा | पोउपनी शशीकांत चिपडे पो स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर | १)राजकुमार रामसिंग शर्मा वय ४८ वर्ष रा. साई नगर वृंदावन कॉलनी अम. २)बादल चरन बोयत वय ३५ वर्ष रा. वल्लभ नगर ,अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की फि पोउपनी शशीकांत चिपडे पो स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर येथे कार्यरत असुन आम्ही दि.२०.०२.२५ रोजी २१.०० वा ते दि. २१.०२.२५ रोजी चे ०९.०० वा पावेतो नाईट अधिकारी म्हणुन कर्तव्यावर हजर असतांना सोबत सहा.पोउपनी साहेबराव गवई ब.न. ११०३ ,पो.शी पंकज ब.न. १५५२ चालक पोशी आनंद ब.न. १५६२ असे पो स्टे हद्दित पोट्रोलिंग करीत असतांना दि. २०.०२.२५ रोजी चे २३.०० वा चे सुमारास चित्रा चौक येथे सरोज टॉकीज जवळ गुजरात कांती रेस्टॉरेंट सुरु दिसले असता आम्ही पो स्टाफसह नमुद रेस्टॉरेंट मध्ये जाउन चेक केले असता रेस्टॉरेंट मध्ये अनेक ग्राहक जेवन करीत होते पोउपनी चिपडे सा नमुद रेस्टॉरेंट चे काउंटर जवळ असलेल्या इसमाने मी चालक आहे असे सांगीतले असता त्यास नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव राजकुमार रामसिंग शर्मा वय ४८ वर्ष रा. साई नगर वृंदावन कॉलनी अम. असे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सांगीतले त्यांना परवाना विचारला असता त्याने लायसन्स हे घरी असल्याचे सांगीतले आम्ही आम्ही त्यांना हॉटेल बंद करण्याबाबत काय आदेश आहे असे विचारले असता त्यांनी २३.०० वा पावेतो आहे नमुद मालक यांना रेस्टॉरेंट बंद करण्याबाबत आ्रदेश दिला असता त्यांनी ग्राहकी करणे सुरुच ठेवले आम्ही दिलेल्या आद्शाचे उल्लंघन  करुन वादवी वेळे पेक्षा जास्त वेळ त्यांचे गुजरात कांती रेस्टॉरेंट सुरु ठेवले आम्ही त्यांना परत आदेश केला असता त्यांनी आरेरावीची भाषा केली व काय कर्यवाही कराची ते करा असे सांगीतले किचन चालु ठेउन नविन ग्राहकास जेवन देणे सुरुच ठेवले आम्ही तेथील ककरा्यवाही पुर्ण झाल्यावर लगेच दि. २१.०२.२५ रोजी ००.१५ वा बाजुचे कन्हैय्या रेस्टॉरेंट मध्ये गेलो असता तेही रेस्टॉरेंट चालु होते व आमचे समोर ग्राहकांना आत बसवितांना दिसले आम्ही काउंटरवरील इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव )बादल चरन बोयत वय ३५ वर्ष रा. वल्लभ नगर ,अम. असे सांगुन तो हॉटेलचा मँनेजर असल्याचे सांगीतले जदर हॉटेलचे मालक संजय शर्मा असल्याचे सांगीतले आम्ही हॉटेल बंद करण्याचे सांगीतले असता साहेब बंद करतो असे म्हणुन किचन चालु ठेउन नविन ग्राहकास देवन देणे सुरुच ठेवले तरी गुजरात कांती रेस्टॉरेंट चे मालक )राजकुमार रामसिंग शर्मा वय ४८ वर्ष रा. साई नगर वृंदावन कॉलनी अम. यांनी त्यांचे रेस्टॉरेंट वाजवी वेळेपेक्षा जास्त वेळ सुरु ठेवले तसेच त्यांनी आदेशाचे उल्लंघन केल्याने माझी त्यांचे विरुद्ध कलम २२३ BNS सह कलम ३३  क्ष /१३१ म.पो.का प्रमाने कायदेशीर रिपोर्ट असुन<br>अश्या फिर्यादिच्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| | भातकुली<br>अपनं. 26/2025 कलम 285 | 2 | वाल्मिक चौक भातकुली | घटना ता वेळ -- दि. 21.02.25 चे 12.00 वा<br>दाखलता.वेळ .. दि. | सर तर्फे पो हे काँ पंकज चव्हाण ब.नं- 377 पोलीस स्टेशन भातकुली | चेतन विष्णुपंत कुटे माटे, वय- 24 वर्षरा- भातकुली | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करित असतांना नमुद घ.ता.वी व ठिकाणी सार्वजनिक रोडवर लोकांचे जिवीतास ईजा होईल अशा धोकादायक स्थितीत एक मोठा फलक नमुद आरोपीने हलगर्जी पणे व निष्काळजी पणे योग्य चीकाळजी न घेता लावले ला मिळुन आल्याने व लावलेल्या फलका बाबत कोणताच परवाना नसल्याने हे कृत्य कलम 285 BNS प्रमाणे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | BNS | | | 21.02.25 चे 15.24 वा | | | होत असल्याने फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे राजापेठ | अप क्र.८१/२० २५ कलम १२(अ) म.जु.का. | सुर्योदय चौक राजापेठ अमरावती | दि.२१/० २/२०२५ चे १२-४५ वा. दरम्यान | दा.ता.व ेळ २१/०१ /२०२ ५ वेळ १५-३४ वा. | सरतर्फे नापोका दिनेश भिसे ब.नं. १३६२, पो.स्टे. राजापेठ अमरावती | संगम सुमेध अंबादे वय ३३ वर्ष रा. आठवडी बाजार बडनेरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की.नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि. हे पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गुप्तमाहितीवर पंचासमक्ष जुगार रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन नगदी ५४५ रू. एक बॉल पेन कि.अं. ०५ रू. व जुगाराच्या चिठ्ठ्या असा एकुण ५५० रू. चा माल मिळुन आला. वरून आरोपीविरूध्द कलम १२(अ) म.जु.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हिशन :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाडगेनगर अम. अप.क्र. १५४/२५ कलम ८५(१) मदाका | पोलीस अधिक्षक कार्यालय अमरावती | दि. २०.२.२०२५चे १८.३०वा<br><br>दाखल दि. २१.०२.२०२५ चे ०१.१४ वा | ईश्वरसिंग लालसिंग पवार वय-४७ वर्ष रा. पोलीस मुख्यालय अम. ग्रामिण | पो.का.राजेश गणेश हरदी वय-४२ वर्ष ब.न.६९२ रा. पोलीस मुख्यालय अम. ग्रामिन | यावेळी फि. यानी आरोपी हे कर्तव्यावर पोलीस अधिक्षक कार्यालय येथे ड्युटीवर असताना त्याना गैरहजर वरून हजर करण्याकरीता मा. अप्पर पोलीस अधिक्षक साहेब यांच्या समक्ष हजर केले असता आंबट व उग्र वास येत असल्याने मा. अप्पर अधिक्षक यांच्या आदेशाने मजकुर पोका ब.न.६९२ यांची वैद्यकिय चाचणी जिल्हा सामन्य रूग्नालय येथे करबन रक्त व लघविचे नमुने घेण्यात आले करीता पुढील कार्यवाहीस सविनय सादर अशा फिय यांच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा म मर्ग क्र. १३/२५ कलम १९४ BNSS | बाबाराव धवने याचे शेतातीव विहीरीत बोरगाव ता. भातकुली जि. अम. | राज बाबुलाल गोंडाने वय २२ वर्ष रा. अडगाव खुर्द ता.ना.खांडेश्वर जि. अम. | प्रशांत बाबाराव धवने वय ३१ वर्ष शेती रा. बोरगाव ता. भातकुली जि. अम.<br>घटना ता. वेळ २१.०२.२०२५ चे ०८.३० वा.<br>दाखल - २१.०२.२०२५ चे १२.४९ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे वरिल ठिकाणी राहत असुन शेतीचा व्यवसाय करतात. बोरगाव येथे फि. चे वडीलाचे दोन एकर शेती असुन सदर विहीरीचे खोदकाम व बामधकाम बबन चव्हान याना देण्यात आले होते त्यानी खोदकामाचे ठिकाणी राज बाबुलाल गोंडाने याला चौकीदार व मजुर म्हणुन ठेवले होते आज दि. २१.०२.२०२५ चे ०८.३० वा. विहरीचे बांधकाम पाहणी करिता गेलो असता राज हा हजर होता व विहरित दोराचे साह्याने उतरु लागला. उतरल्या नतर त्याच हात दोरावरुन निसटल्यामुळे तो पाण्यात पडला. त्याला पोहता येत नसल्याने हात पाय मारु लागला. फि. ने त्याला वाचनण्याचा प्रयत्न केला. दोर फेकला. तेवढ्यात तेथुन जाणारा ट्रक्टरल वाला रगारी याला आवाज दिला. आम्ही दोघे पण वाचविण्याचा प्रयत्न केला त्याला पोहता येत नसल्याने तो पाण्याच डुबला. अग्रनीशामक दलाला फोन करुन बोलाविले . पोलीस पाटील यानी पो. स्टे ला माहिती दिली. . फि. च्या शेतात विहिकीत काम करताना दोराते हात सुटल्याने पाण्यात बुडुन मृत्यु झाला. हाच माझा जबानी रिपोर्ट आहे. अशा फि. रि वरुन व इर्विन चौकी येथुन मृतकाचे मरणाचा मेमो क्र. ३२१० दि. २१.०२.२०२५ वरु सदरचा मर्ग दाखल |